# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

टेलि. : २४०१०४३७
२४०२०७८१
२४०१४७०१
फॅक्स : २४०२ ४०६८
Visit us at : http://mpcb.mah.nic.in

कल्पतरू पॉईंट, २/३/४ था मांळा,
सिने प्लॅनेटसमोर,
सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व),
मुंबई - ४०० ०२२.

## माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या ॲपेलेट ऑथॉरिटीसमोर

## सुनावणी दिनांक २०/०५/२००९

**श्री. किशोर बापूराव टाकणे** ...अर्जदार/ॲपेलेट

विरुध्द

**माहिती अधिकारी,**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
मुंबई ...उत्तरवादी/रिसपॉंडंट

## आदेश

अपिल करणार यांनी एकूण ४ अपिल दाखल केलेले असून, त्यापैकी आस्थापनाशाखेने दिलेल्या क्रमांकानुसार अपिल क्रमांक १ मधील मुद्दा क्रमांक अ बाबत अपिलकर्त्यांना आस्थापनाशाखेने दिनांक १९/०५/२००९ च्या पत्रानुसार दिलेली माहिती आज दिनांक २०/०५/२००९ रोजी अपिलाच्या सुनावणीच्या वेळी प्रत्यक्ष देण्यात आली. तसेच त्यावर त्यांची स्वाक्षरी देखील घेण्यात आली.

अपिलकर्ता यांना मुद्दा क्रमांक अ मधील माहिती तपासून ती योग्य किंवा बरोबर आहे किंवा नाही अशी विचारणा केली असता, सदरहू माहिती बरोबर असून, ती मिळालेली आहे, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

मुद्दा क्रमांक ब मधील माहितीबाबत अपिल करणार यांना विचारले असता, त्यांनी असे स्पष्ट केले की, आस्थापनाशाखेने मंडळाने कंत्राटी नेमणूकांबाबत काय कार्यवाही केली याची सविस्तर माहिती व त्यासंबंधात निर्गमित सर्व आदेशांच्या सन २००८ मध्ये व त्यानंतर निर्गमित करण्यात आलेल्या कंत्राटी नेमणूकांबाबतच्या आदेशाच्या छायांकित प्रती

उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. तसेच पर्यावरण विभागास याबाबतचा जो पत्रव्यवहार करण्यात आला त्याची प्रत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. मात्र कंत्राटी नेमणूकांवर आक्षेप दर्शवून विधीमंडळात उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेतील दुस-या मुद्दयांबाबत दिलेल्या उत्तराबाबत त्यांचे समाधान झाले नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. परंतु ज्या स्वरुपात माहिती मागितली, त्या स्वरुपात आस्थापनाशाखेने माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

दिनांक २५ मे, २००९ रोजी मुंबई येथून

(द. त्रि. देवळे)
अपीलीय अधिकारी
म. प्र. नि. मंडळ

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

टेलि. : २४०१०४३७
२४०२०७८१
२४०१४७०१
फॅक्स : २४०२ ४०६८
Visit us at : http://mpcb.mah.nic.in

कल्पतरू पॉईंट, २/३/४ था मांळा,
सिने प्लॅनेटसमोर,
सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व),
मुंबई - ४०० ०२२.

## माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या ॲपेलेट ऑथॉरिटीसमोर

## सुनावणी दिनांक २०/०५/२००९

श्री. किशोर बापूराव टाकणे ...अर्जदार/ॲपेलेट

विरुध्द

माहिती अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
मुंबई ...उत्तरवादी/रिसपाँडंट

## आदेश

अपिल करणार यांनी दाखल केलेल्या दुस-या अपिलातील मुदयाबाबत आस्थापनाशाखेने दिनांक १९/०५/२००९ च्या पत्राची प्रत अपिल सुनावणीच्या वेळी उपलब्ध करुन दिली. त्यामध्ये उपलब्ध केलेल्या माहितीबाबत खालीलप्रमाणे तपशील देण्यात येत आहे.

<u>मुद्दा क्रमांक अ</u> -बाबत अपिलकर्ता यांनी असे स्पष्ट केले की, जरी आस्थापनाशाखेने कर्मचारी संघटनेने केलेल्या तक्रारीची प्रत त्यांना उपलब्ध करुन दिली असली तरी सुध्दा कार्यालयीन टिप्पणी, ज्याद्वारे त्यांच्या सेवा संपुष्टात आणल्या ती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. तसेच त्यांच्या सेवा संपुष्टात आणण्याच्या आदेशामध्ये कर्मचारी संघटनेच्या तक्रारीवरुन त्यांच्या सेवा संपुष्टात आणण्यात आल्या, असे स्पष्ट करण्यात आलेले नाही.

त्याबाबत वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी अशी माहिती सेवा संपुष्टात आणण्याच्या आदेशामध्ये लिहिणे बंधनकारक नसल्याचे नमुद केले. मात्र कार्यालयीन

टिप्पणी ज्याद्वारे श्री. किशोर टाकणे यांच्या सेवा संपुष्टात आणल्या, त्या टिप्पणीची प्रत उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचे स्पष्ट केले.

<u>मुददा क्रमांक ब</u> :- बाबत अपिल करणार यांनी, आस्थापनाशाखेने दिलेल्या उत्तराबाबत असे स्पष्ट केले की, मुख्यमंत्री व उप-मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांना अपिलकर्ता यांनी सादर केलेल्या पत्रावरील सखोल चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबतच्या निर्देशाची प्रत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास मिळाली नाही. त्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कोणताही अहवाल सदरहू प्रकरणी पाठविलेला नाही, त्यामुळे अपिल करणार यांनी, सदरहू पत्र सदस्य सचिव यांच्या कक्षामध्ये प्राप्त झाले असून, त्याची नोंद त्यांनी पाहिलेली आहे, असे स्पष्ट केले. तसेच त्यांच्याकडे प्राप्त असलेल्या पत्राची दिनांक १४/११/२००८ प्रत त्यांनी जोडपत्रासहीत दाखविली.

त्याबाबत असे पत्र प्राप्त झाले असल्यास पुन्हा तपासणी करुन सदरहू पत्राबाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशील १५ दिवसांच्या आत अपिल करणार यांना उपलब्ध करुन देण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले.

<u>मुद्दा क्रमांक क</u> - बाबत अपिलकर्ता यांनी असे स्पष्ट केले की, आस्थापनाशाखेमार्फत त्यांच्या पत्रावर काय कार्यवाही करण्यात आली ? याबाबत (क) आणि (ड) या मुद्दयांबाबत दिनांक १९/०५/२००९ च्या पत्राद्वारे दिनांक २०/०५/२००९ रोजी सुनावणीच्या वेळी माहिती दिलेली आहे. मात्र मा. मंत्री महोदय पर्यावरण व मा. राज्यमंत्री, पर्यावरण यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्रावर काय कार्यवाही केली, हे स्पष्ट करण्यात आलेले नाही.

जरी पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांना देण्यासाठी पत्र तयार करण्यात आलेले होते आणि त्याप्रमाणे श्री. किशोर टाकणे यांच्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे ठरल्यामुळे असे पत्र न देता कार्यवाही पूर्ण करुनच सदरहू (क) आणि (ड) वरील कार्यवाही पर्यावरण विभाग आणि मा. मंत्री महोदय यांना कळविण्याचे ठरले.

तसेच श्री. किशोर टाकणे यांना रिक्त असलेली शिपाई संवर्गातील पदे भरताना मुलाखतीस बोलाविण्याचे ठरले, असे आस्थापनाशाखेतर्फे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी स्पष्ट केले. त्याप्रमाणे श्री. किशोर टाकणे यांना सुनावणीच्या वेळी दिलेल्या उत्तरामध्ये कळविण्यात आलेले आहे.

येणेप्रमाणे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

दिनांक २५ मे, २००९ रोजी मुंबई येथून

( द. त्रि. देवळे )
अपीलीय अधिकारी
म. प्र. नि. मंडळ

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

टेलि. : २४०१०४३७
२४०२०७८१
२४०१४७०१
फॅक्स : २४०२ ४०६८
Visit us at : http://mpcb.mah.nic.in

कल्पतरू पॉईंट, २/३/४ था मांळा,
सिने प्लॅनेटसमोर,
सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व),
मुंबई - ४०० ०२२.

## माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या ॲपेलेट ऑथॉरिटीसमोर

### सुनावणी दिनांक २०/०५/२००९

श्री. किशोर बापूराव टाकणे ...अर्जदार/ॲपेलेट

विरुध्द

माहिती अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
मुंबई ...उत्तरवादी/रिसपाँडंट

## आदेश

अपिल करणार यांच्या अपिल क्रमांक ३ मध्ये उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबत आस्थापनाशाखेने एकत्रित दिलेल्या दिनांक १९/०५/२००९ च्या पत्राची प्रत दिनांक २०/०५/२००९ रोजी सुनावणीच्या वेळी उपलब्ध करुन देण्यात आली. त्यामधील मुदयांबाबत खालीलप्रमाणे चर्चा होऊन निर्णय घेण्यात आला.

<u>मुद्दा क्रमांक अ :-</u> जानेवारी २००८ मध्ये क्षेत्र शिपाई/शिपाई या संवर्गात २ पदे रिक्त असल्याची माहिती आस्थापनाशाखेने दिली असल्याचे अपिल करणार यांनी मान्य केले.

<u>मुद्दा क्रमांक ब :-</u> क्षेत्र शिपाई/शिपाई या संवर्गाच्या बिंदुनामावलीची छायाप्रत देखील प्राप्त झाल्याचे अपिलकर्ता यांनी सांगितले.

<u>मुद्दा क्रमांक क</u> :- मंडळातील क्षेत्र शिपाई/ शिपाई व सफाईकामगार ही पदे नामनिर्देशनाने भरण्याचे अधिकार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना असल्याचे स्पष्ट करण्यात आलेले अपिलकर्ता यांनी उत्तरावरुन सांगितले. मात्र अशी पदे भरण्याची कार्यपध्दती (सेवाप्रवेश नियमानुसार) करण्यात येत असल्याचे आस्थापनाशाखेतर्फे स्पष्ट करण्यात आले तरीसुध्दा त्याच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात न आल्याबाबत अपिलकर्ता यांनी निदर्शनास आणले. वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी

सदरहू सेवाशर्तीचे नियम उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचे स्पष्ट केले. तसेच सदरहू सेवाशर्ती नियमांची प्रत उपलब्ध करुन देण्यात आली.

येणेप्रमाणे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

दिनांक २५ मे, २००९ रोजी मुंबई येथून

( द. त्रि. देवळे )
अपीलीय अधिकारी
म. प्र. नि. मंडळ

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

टेलि. : २४०१०४३७
२४०२०७८१
२४०१४७०१
फॅक्स : २४०२ ४०६८
Visit us at : http://mpcb.mah.nic.in

कल्पतरू पॉईंट, २/३/४ था माळा,
सिने प्लॅनेटसमोर,
सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व),
मुंबई - ४०० ०२२.

**माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या ॲपेलेट ऑथॉरिटीसमोर**

**सुनावणी दिनांक २०/०५/२००९**

**श्री. किशोर बापूराव टाकणे** ...अर्जदार/ॲपेलेट

विरुध्द

**माहिती अधिकारी,**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
मुंबई ...उत्तरवादी/रिसपॉंडंट

## आदेश

अपिल करणार यांना अपिल क्रमांक ४ मधील माहितीबाबत आस्थापनाशाखेने प्राप्त करुन दिलेल्या दिनांक १९/०५/२००९ च्या एकत्रित माहितीची प्रत सुनावणीच्या वेळी उपलब्ध करुन दिल्यानंतर झालेल्या चर्चेनुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

**मुद्दा क्रमांक अ : -** मध्ये मागितलेल्या कंत्राटी तत्वावरील व नियमित नियुक्तीच्या सर्व आदेशांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिल्याचे अपिलकर्ता यांनी मान्य केले.

**मुद्दा क्रमांक ब :-** बाबत सौ. चंपा राठोड व श्री. अतुल पेठणे यांच्या २००८ मधील मंडळाच्या आस्थापनेवरील नियमित नियुक्तीच्या प्रकरणी कार्यालयीन टिप्पणी यापूर्वीच अपिल करणार यांच्याकडे प्राप्त झाल्यामुळे ती त्यांच्याकडे कशी उपलब्ध झाली याची आस्थापनाशाखेमार्फत विचारणा करण्यात आली. त्याबाबत श्री. किशोर टाकणे यांनी, त्यांच्या हितचिंतकामार्फत प्राप्त झालेली टिप्पणी बरोबर आहे किंवा नाही, यासाठी त्यांना प्रमाणित कार्यालयीन टिप्पणीची प्रत आस्थापनाशाखेकडून प्राप्त करुन हवी आहे, असे स्पष्ट केले. त्याबाबत आस्थापनाशाखेने प्रमाणित प्रत उपलब्ध करुन दिली

येणेप्रमाणे अपिल निकाली काढण्यात आले.

दिनांक २५ मे, २००९ रोजी मुंबई येथून

(सही)
( द. त्रि. देवळे )
अपीलीय अधिकारी
म. प्र. नि. मंडळ